मजकुर :—

दिनांक—२०/१२/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ’’** माहे सप्टेंबर —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे .

## (क) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर—२०२४

| | | |
|---|---|---|
| १ | वडाळा पोलीस ठाणे, बंदर परिमंडळ, मुंबई | गु.र.क्र. ११३/२४, कलम ३०५ (अ), ११२, ३ (५) भारतीय न्याय संहिता २०२३ |

—: “ उघडया खिडकीतुन प्रवेश करून चोरी करणे ’’:—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात दिनांक १९/०७/२४ रोजी ०४:३० वा. ते ०५:१० वा.च्या दरम्यान एका अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांच्या घराच्या पोटमाळयावरील उघडया खिडकीतून प्रवेश करून लोखंडी कपाटामध्ये ठेवलेले बाजूस नमूद वर्णनाचा मुद्देमाल एकूण ३१.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच फिर्यादीची पत्नी व आई वापरत असलेला बाजूस नमूद वर्णनाचे मोबाईल फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी केले म्हणुन गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. इशरत अली रहमतअली शाह, वय ३५ वर्षे, |
| चोरीस गेलेली रक्कम | :— | १) किं.अं.रू. ४०,०००/— किमतीचा एक सोन्याचा गळयातील हार, वजन — अंदाजे १५ ग्रॅम<br>२) किं.अं.रू. २०,०००/— किमतीचे सोन्याचे कानातील २ झुमके वजन — अंदाजे ७ ग्रॅम<br>३) किं.अं.रू. २०,०००/— किमतीच्या हातातील सोन्याच्या २ अंगठया प्रत्येकी वजन — ३.५ ग्रॅम वजनाचे असे एकूण ७ ग्रॅम<br>४) किं.अं.रू. ५,०००/— किमतीचे सोन्याचे लहान मुलींच्या नाकात घालावयाचे खिल असे चार खिल वजन अंदाजे २.५ ग्रॅम<br>एकुण किंमत ८५,०००/रू.<br>फिर्यादी यांची पत्नी व आई यांचे वापरातील चोरीस गेलेल्या मोबाईलचे वर्णन —<br>१) किं.अं.रू. ४,०००/— किमतीचा निळया रंगाचा होनार कंपनीचा वापरता मोबाईल<br>IMEI NO.८६९२२६०४३२५२७२६, व्होडा व आयडीया कंपनीचे सिमकार्ड — ९९३०६७७३४३<br>२) किं.अं.रू. १,०००/— किमतीचा निळया रंगाचा इंफिनिक्स कंपनीचा वापरता मोबाईल<br>IMEI NO . ३५९११०६३४८००४६४, एअरटेल कंपनीचे सिमकार्ड — ९९३०६८०३४३<br>३) किं.अं.रू. २,०००/— किमतीचा रेड मी कंपनीचा |
| हस्तगत मालमत्ता | :— | एकुण ३५.६८ ग्रॅम वजनाचे सोने एकूण किंमत १,७६,७५०/रू. व १९ मोबाईल एकुण किंमत १,०७,०००/<br>असे एकुण रू. २,८३,७५०/ रक्कमेचा मुद्देमाल हस्तगत |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात आला आहे. |
| आरोपी अटक व दिनांक | :— | **१) विरेंन्द्र जयराम विश्वकर्मा उर्फ सिकंदर, वय २४ वर्षे,**<br>**२) शमशाद इबरार अहमद, वय २४ वर्षे,**<br>आरोपी क्र. १ यास **दिनांक - २१/०८/२०२४ रोजी**<br>आरोपी क्र. २ यास **दिनांक - २२/०८/२०२४ रोजी** |

<u>तपास कौशल्य :—</u> सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर मा.पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ, मा. स.पो.आ. वडाळा विभाग, व.पो.नि. श्री. मिलींद जाधव व पो.नि. (गुन्हे) विकास म्हामुणकर यांचे मार्गदर्शना खाली स.पो.नि. गणेश आखाडे (गुन्हयाचे तपासी अधिकारी) व गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार यांनी गुन्हयाच्या तपासादरम्यान गुप्त बातमीदारामार्फतीने गुन्हयातील संशयित इसमाचा शोध घेतला असता, विरेंन्द्र जयराम विश्वकर्मा उर्फ सिकंदर हा संशयित इसम मिळून आला.

त्यास पोलीस ठाणेस आणून त्याच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने सखोल तपास केला असता, त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आली आहे तसेच त्याचा साथीदार शमशाद इबरार अहमद, वय—२४ वर्षे याचा देखील नमूद गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास देखील नमूद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

नमुद अटक आरोपींकडे गुन्हयाच्या अनुषंगाने अधिक तपास केला असता आरोपी नामे विरेंन्द्र जयराम विश्वकर्मा उर्फ सिकंदर याचा गु.र.क्र. ५३/२४, कलम ३८०, ४११ भा. द.वि., गु.र.क्र. ७५/२४, कलम ३८० भा.दं.वि., गु.र.क्र. १०२/२४, कलम ३८० भा.दं.वि. गु.र.क्र. १०७/२४, कलम ३०५ (अ) भारतीय न्याय संहिता २०२३ या गुन्हयामध्ये देखील सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याचा वर नमुद गुन्हयात मा. न्यायालयातुन ताबा घेण्यात आला आहे तसेच नमूद आरोपीने त्याच्या साथीदाराच्या मदतीने वडाळा पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये वेगवेगळया गुन्हयामध्ये चोरी केलेल्या मुद्देमालापैकी एकुण ३५.६८ ग्रॅम वजनाचे सोने एकुण किंमत १,७६,७५०/रू. व १९ मोबाईल एकूण किंमत १,०७,०००/ असा एकूण किंमत २,८३,७५०/रू. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

वडाळा पोलीस ठाणे, बंदर परिमंडळ, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक पोलीस आयुक्त वडाळा विभाग | श्री.विजय धोंडिबा भिसे | प्रशस्तीपत्रक |
| २ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री.मिलींद नामदेव जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस निरीक्षक | श्री.विकास महादेव म्हामुणकर | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री.गणेश काशिनाथआखाडे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ह.क्र.०६.१६८३ | सुहास भगवान कासार | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.शि.क्र.११.०५०८ | सुहास प्रभाकर मखरे, | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.शि.क्र. ११.३४१४ | अनिल विजय बाबर | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.शि.क्रं. १४.०६९९ | अमोल बापू वलेकर | प्रशस्तीपत्रक |

<u>मजकुर :—</u>

दिनांक २०/१२/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ‘‘ **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे सप्टेंबर —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## <u>(ड) १) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर— २०२४</u>

| | | |
|---|---|---|
| ०१ | पवई पोलीस ठाणे, परिमंडळ—१०, मुंबई | गु.र.क्र. ५२४/१७ कलम ३७६,(२) (एल) ३२३, ५०४, ५०६, भादवी सह ४,६,८, बालकांचे लैगीक अपराधांपासुन संरक्षण अधिनियम २०१२ |

### —: ‘‘ <u>अल्पवयीन मतीमंद मुलीवर लैगिंक अत्याचार</u> ’’:—

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :— नमुद गुन्हयात यातील फिर्यादी नामे श्रीमती शारदा अमल बागरा, वय ३१ वर्षे, यांनी दिनांक ०४/११/२०१७ रोजी पवई पोलीस ठाणे येथे मागील काही दिवसापासुन ते अदयापपर्यत यातील आरोपी नामे गणेश उर्फ गण्या भिकाजी बंजारी वय ३२ वर्षे, धंदा — नोकरी रा.ठी. फुकटनगर, एल अॅण्ड टी कंपनीच्या मागच्या बाजुला, बी.एम.सी. ऑफिसच्या जवळ, पवई मुंबई याने त्याची भाची पिडीत मुलगी नामे सुनिता जाधव वय १२ वर्षे, ही मतीमंद आहे हे माहित असुनही वेळोवेळी तीच्या अंगाला हात लावुन तिच्यावर जबरदस्तीने संभोग करून तिला हाताने मारून शिवीगाळ व धमकी देवुन तिच्यावर अत्याचार केला म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती शारदा अमल बागरा,३९ वर्षे |
| बळीत | :— | |
| निकाल दिनांक | :— | दिनांक २४/०९/२४ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | गणेश भिकाजी वजारे वय ३२ वर्षे,,<br>**<u>अटक दि—०४/११/२०१७ रोजी</u>** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्यातील आरोपी नामे गणेश भिकाजी वजारे यास दिनांक २४/०९/२४ रोजी मा. सत्र न्यायालय कोर्ट क्रं. १५ न्यायाधिश श्री डी. जी. ढोबळ यांनी आरोपीला गुन्हयात दोषी ठरवुन <u>आजन्म कारावास</u> व २५०००/ — रूपये द्रव्य दंड, दंड न भरल्यास ०१ महिना कारावास अशी शिक्षा सूनावली आहे. |

<u>तपास कौशल्य</u> :— नमुद गुन्हयात यातील तपासी अधिकारी यांनी योग्यप्रकारे तपास करुन गुन्हयाच्या तपासात त्रुटी ठेवल्या नाहीत. तसेच यातील मार्गदर्शक अधिकारी यांनी नमुद गुन्हयाच्या सुनावणी च्या वेळी योग्य मार्गदर्शन केले. व न्यायालयीन कोर्ट कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी फिर्यादी व साक्षिदार यांना योग्य मार्गदर्शन करुन साक्ष देण्याकरीता सहाय केले. व समन्स वॉरन्ट अंमलदार यांनी यातील साक्षिदार व पंच तसेच वैघकिय अधिकारी यांना वेळेत मा. न्यायालयात हजर ठेवले.

तसेच पोलीस गुन्हे यांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक गुन्हे मदतनीस यांनी मा. न्यायालयाने दिलेल्या तारखेला पंच साक्षिदार फिर्यादी, बळीत याना कोर्टात हजर ठेवण्यासाठी वेळेत पत्र व्यवहार करून नमुद केसच्या सर्व कागदपत्रांची वेळेत पुर्तता केली.

पवई पोलीस ठाणे, परिमंडळ—१०, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री.जितेंद्र सिताराम सोनवणे, | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरिक्षक (गुन्हे) | श्री.गणेश सुधाकर पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री.संजय मारूती लाड | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस उप निरीक्षक | श्री.पाडुरंग आबासाहेब कोळपे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | स.फौ.क्र.३०९९१ | लक्ष्मण दत्तात्रय अडांगळे | प्रशस्तीपत्रक |
| ६ | स.फौ.क्र.३१९७४ | अजय जनार्दन पवार | प्रशस्तीपत्रक |
| ७ | महिला पो.शि.क्र.०८.१२४७ | मनिषा हरीभाऊ थोरात | प्रशस्तीपत्रक |
| ८ | महिला पो.शि.क्र १३.०६०८ | सुवर्णा दिपक येवले, | प्रशस्तीपत्रक |